# वसई विरार शहर महानगरपालिका

## विद्युत विभाग, मुख्यालय

## निविदा सुचना क्र.०६ (२०२२-२३)

वसई-विरार शहर महानगरपालिका विद्युत विभागाकडील खालील कामाकरीता शासनाचे विद्युत विभागाकडील योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदाराकडुन **बी-१ नमुन्यात दोन लखोटा** पध्दतीनुसार महानगरपालिकच्या अटी व शर्तीस अधीन राहून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. ०४/११ /२०२२ पासुन ते दि.१८ /११ /२०२२ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत महापालिकेच्या कार्यालयीन कामकाजाचे वेळी रोखीने विकत मिळतील. सदर कामाची इसारा रक्कम आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट लखोटा क्र. १ सोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा न भरलेल्या , खाडाखोड करुन स्वाक्षांकीत न केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सशंत निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पुर्णपणे भरलेल्या मोहरबंद निविदा दिनांक०५/११ /२०२२ पासून ते दि.२१ /११ /२०२२ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत महानगरपालिका विद्युत विभाग, मुख्यालय, विरार (पूर्व) येथे स्विकरण्यात येतील. प्राप्त निविदा कार्यकारी अभियंता, मुख्यालय, विरार (पूर्व) यांच्या दालनात हजर निविदाधारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष शक्यतो त्याच दिवशी दुपारी ४:०१ वा.अथवा इतर सोयीच्या दिवशी उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अदांजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रूपये | निविदा फॉम फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "एफ" कार्यक्षेत्रातील शहरी बेघर निवारा केंद्र, वालई पाडा येथे सोलार वॉटर हिटर व १० कि.वॅट क्षमतेचे सोलार यंत्रणा बसविणें तसेच सदर सोलार यंत्रणा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे ग्रिड यंत्रणेस जोडणी करणे. | ९,९१,५२५/- | १०,०००/- | रू.५००/- +१८% GST रु.५९०/- | २% डी.डी.ने व २% देयकातुन | ३० दिवस |
| २ | वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "जी" कार्यक्षेत्रातील शहरी बेघर निवारा केंद्र, बेलीचा पाडा, वालीव, वसई (पु.) येथे सोलार वॉटर हिटर व १० कि.वॅट क्षमतेचे सोलार यंत्रणा बसविणें तसेच सदर सोलार यंत्रणा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे ग्रिड यंत्रणेस जोडणी करणे. | ९,९२,९२०/- | १०,०००/- | रू.५००/- +१८% GST ५९०/- | २% डी.डी.ने व २% देयकातुन | ३० दिवस |

१) कोरे निविदा फॉर्म खरेदीची अंतिम दि.१८ /११ /२०२२ रोजी पर्यंत राहील.

२) कोरे निविदा फॉर्मची मागणी करतेवेळी अर्जा सोबत सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

३) ठेकेदाराने निविदा भरताना गुडस् ऍण्ड सर्विस टॅक्स (GST) चा विचार करुन निविदा दर भरावे. तसेच शासनाने वेळोवेळी लागू केलेले दर किंवा दर करार शासनानें वेळोवेळी निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे सर्व समावेश करुन भरण्यात यावे.

४) ठेकेदारांनी निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावे.

लिफाफा क्र.०१ मध्ये खालील कागदपत्रांच्या छायांकीत प्रतींचा समावेश असणे आवश्यक आहे.

**१) सा.बां.विभाग (विद्युत) कडील योग्य वर्गातील नोंदणी प्रमाण पत्राची छायांकीत प्रत २) १०० रु.स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-अ) ३) ५००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर घोषणापत्र (परिशिष्ट-ब) ४) इसारा रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट ५) विद्युतीय कामे केल्याचा अनुभव दाखला ६) गुडस् ऍण्ड सर्विस टॅक्स (GST) नोंदणी छायांकीत प्रत.**

निविदेतील लिफाफा क्र.०१ मध्ये तसेच निविदा मंजूरी व देयक अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहील. सार्वजनिक बांधकामाचे अधिकारी त्यास जबाबदार असणार नाही. सदरची कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये नसल्यास संबंधित निविदाधारकास अपात्र ठरविण्यांत येईल व फक्त पात्र निविदाधारकांच्या स्पर्धात्मक निविदा बोलीचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

५) कंत्राटदारानी द्वितीय लखोटयामध्ये बी - १ नमुन्यात दर भरण्यात यावे.

६) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२, दि.२६ नोव्हेंबर २०१८ अन्वये अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किंमतीच्या देकार सादर करणाऱ्या निविदाधारकांनी लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्या L-१ निविदाकाराने Additional Performance Security Deposit चा डी.डी. आठ दिवसांच्या आत या कार्यालयात जमा करावा. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणांसाठी शिथीलक्षम असणार नाही.

७) प्रथम न्युनतम देकाराच्या (L-१) निविदाकाराने वरील विहित मुदतीत Performance Security Deposit चा भरणा केली नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या L-२ निविदाकारास लेखी विचारणा करण्यात येईल व L-२ निविदाकार L-१ पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजुर करण्यात येईल.

८) अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार असल्यास इसारा रक्कम बरोबर अतिरिक्त जमा करावा लागणारे परफॉर्मन्स सिक्युरिटी पुढील प्रमाणे :-

a) प्राप्त निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांचा असेल अशा ठेकेदारांनी निविदाधीन किंमतीच्या १% एवढ्या रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावा. (उदा.१% ते १०% कमी दर असल्यास १% रक्कम)

b) प्राप्त निम्नतम निविदेचा कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल दर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे तेवढ्या रक्कमेचा व वरील बाब - ८ प्रमाणे येणाऱ्या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष (Demand Draft) निविदेसोबत लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावा. (उदा.१४% कमी दर असल्यास १०% पर्यंत दराकरिता =१% व (१४% - १०% = ४%) असे एकूण ५%

c) देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी.ने सादर करणे अनिवार्य राहील. (उदा.१९% कमी दर असल्यास १०% पर्यंत दराकरीता= १% व १५% कमी दरापर्यंत (१५%-१०%=५%) तसेच (१९%-१५%=४% करिता ४%x२%=८%) असे एकुण (१%+५%+८% = १४%)

९) शासन परिपत्र दि. १६/११/२०१८ नुसार परफॉर्मन्स सिक्युरिटीच्या डिपॉझीटचा धनाकर्ष (डी.डी) सिलबंद लिफाफा मधुन कंत्राटदाराने लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर ८ दिवसांच्या आत विद्युत विभागात जमा करावा. लिफाफा वर कामाचे नाव व निविदा सुचना क्र. लिहिण्यात यावा. परफॉर्मन्स सिक्युरिटीच्या डिपॉझीटचा धनाकर्ष द्वितीय लखोटा उघडल्याचे दिनांकापासुन आठ दिवसांत सादर न केल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

१०) निविदा उघडल्यानंतर लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची पुर्तता न झाल्यास संबंधित कंत्राटदारांना त्यांच्या धनाकर्षाचे लिफाफे निविदा उघडल्याच्या दिनांकापासुन ८ दिवसांत परत करण्यात येईल.

११) लिफाफा क. १ मधील कागदपत्रांची पुर्तता घेऊन ज्या कंत्राटदाराने लिफाफा क्र. २ चे मधील देकार उघडण्यात येतील त्यामधील क्र. २ चे निम्नतम निविदाकाराचे धनाकर्ष लिफाफे वगळता इतर कंत्राटदारांचे धनाकर्ष लिफाफे ७ दिवसात परत करण्यात येतील.

१२) निम्नतम निविदाकारांना कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३ दिवसांत क्र. २ चे निम्नतम निविदाकाराचा धनाकर्ष परत करण्यात येईल.

१३) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे / धनाकर्ष सादर करणाऱ्या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल व संबंधित कंत्राटदाराला काळया यादीत सामाविष्ट करण्यात येईल. यासंबंधी मा.आयुक्त / मा.अति.आयुक्त / मा.उप-आयुक्त (विद्युत) यांना पुर्ण अधिकार राहतील.

१४) निविदा कामाबाबत तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास फेरनिविदा मागविण्याचा तसेच कोणत्याही कारणाशिवाय निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

१५) काम समाधानकारक पुर्ण झाल्यावर प्राप्त परफॉर्मन्स सिक्युरिटी रक्कम कंत्राटदारास परत करण्यात येईल.

१६) मुदतीत प्राप्त झालेली निविदा दि.२१/११/२०२२ रोजी दुपारी ४:०१ वाजेपर्यंत अथवा इतर सोयीच्या दिवशी उघडण्यात येतील.

१७) निविदाबाबत काही शंका असल्यास माहितीसाठी विद्युत विभाग, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

१८) कोणतीही एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त,वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

जावक क्र. :वविशम/मु.विद्युत/५५५/२०२२
दिनांक : ०२/११/२०२२

कार्यकारी अभियंता
तथा
प्र.शहर अभियंता
वसई-विरार शहर महानगरपालिका

# १०० रुपये स्टॅम्प पेपरवरील नमुना

## (परिशिष्ठ "अ")

## प्रतिज्ञापत्र

मी / आम्ही याव्दारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० व कलम ११ तरतुदीच्या खाली उतंधृत केलेल्या आहेत. माहिती आहे आणि गंभिरपणे नमुद करतो की, महानगरपालिकेशी किंवा महानगरपालिकेच्या अधिन किंवा महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये नगर परिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आमच्याशी नाही.

(कलम १० :- यापुढे तरतुद केली असेल त्या व्यतिरीक्त, महानगरपालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा, महानगरपालिकेशी किंवा अधिन किंवा महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेमध्ये जीचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल.)

(कलम ११ :- पालिका सदस्य म्हणुन किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणुन ज्या कोणत्याही बाबीतीत कलम १० व कलम ११ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्यांच्या भागीदारीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल मग अश्या हिश्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो, किंवा जोत ज्याचा अशीलाच्या, प्रकत्याचा किंवा इतर व्यक्ती च्या वतीने व्यवसायीकदृष्टया त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.)

निविदाधारकाचे नाव :- निविदाधारकाची सही

पत्ता :-

दिनांक :-

साक्षीदाराचे नाव :- साक्षीदाराची सही

पत्ता :-

दिनांक :-

# ५०० रुपये स्टॅम्प पेपरवरील नमुना

## (परिशिष्ठ "ब")

## सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी श्री.________________ वय ______________ वर्ष राहणार ______________________________

______________________ ____________ या सत्यप्रतिज्ञापत्राद्वारे लिहून देतो की, मी

मे.______________________ या फर्मचा / कंपनीचा मालक असुन ______________

______________________________________________ या कामासाठी आम्ही इच्छुक

आहे. सदर कामाकरीता सादर केलेली कागदपत्रे खरी, बरोबर व पुर्ण आहेत. त्यामध्ये कोणत्याही त्रुटी चुका नाहीत. याची मी खात्री केलेली असुन असे शपथपुर्वक खालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रामध्ये काही चुकीची, दिशाभुल करणारी, खोटी व तसेच अपुर्ण माहिती आढळल्यास मी भारतीय दंडसहित अंतर्गत कायदेशिर कारवाहीस पात्र राहीन.

१. जर कंत्राट कालावधी दरम्यान, मी माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचा-यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला/ विद्युत विभागाला कोणतीही खोटी माहिती किंवा देयक समवेत तसेच पत्रव्यवहार खोटी/ बनावट साहित्य खरेदीचा कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कारवाहिस पात्र राहीन.

२. जर कंत्राट कालावधी दरम्यान, आणि काम समाप्ती नंतर, अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादर केलेले कोणतेही खोटी/ बनावट किंवा फसवी आढळयास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कारवाहीस पात्र राहीन.

३. जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी / बनावट, फसवी किंवा दिशाभुल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

कंत्राटदाराची सही व शिक्का